# विद्यापीठस्तरीय लोकनृत्य स्पर्धा



*तालुका प्रतिनिधी / २५ डिसेंबर*

**भद्रावती :** श्री शिवाजी कला, वाणिज्य व विजय महाविद्यालय राजूरा तथा माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने विद्यापीठ स्तरीय लोकनृत्य स्पर्धा २०१८ चे आयोजन स्व.शिवाजी महाविद्यालय राजूरा येथे दि.२२ डिसेंबर ला करण्यात आले.

या स्पर्धेत निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालयातील विद्यार्थी साहील आत्राम, अश्विनी करमनकर, पायल शेरकी, हर्षदा हिरादेवे, सतिश राजूरकर, रुपेश ठाले, संचित घुटके, सोजल शेरकी, प्रज्वल कमाने, प्रफुल खापने इत्यादी ने आपला सहभाग घेऊन द्वितीय पारितोषिकांचे मानकरी ठरले त्यात रोख ७००० रु सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लेमराज लडके, संस्थेचे सहसचिव डॉ.विवेक शिंदे, डॉ. कार्तिक शिंदे, महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या समन्वयक डॉ.अपर्णा धोटे महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विजयी चमूचे अभिनंदन केले. संस्थेचे सचिव तथा माजी आ. निळकंठराव शिंदे त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

ePaper देशोन्नती
Wed, 26 December 2018
deshonnati.digitaledition.in/c/35


Nilkantharao Shinde
Science & Arts College
BHADRAWATI DIST-CHANDRAPUR


Science & Arts
BHADRAWATI, DIST.


Shinde
& Arts College
DIST-CHANDRAPUR